प्रभु येशु ख्रिस्त लौकरच पृथ्वीवर येणार आहे. 2000 वर्षापुर्वी जेव्हा तो जगात होता तेव्हाच त्याने हे वचन दिले (**योहान १४ : १-३**). तो खरेच पुन्हा येणार आहे का ? हे सत्य आपण कसे जाणू ? कृपया भविष्यवाणी वाचा प्रभु येशु स्वतःच म्हणतो कि अंतकाळी असे घडेल. हे शास्त्रवाचनाने आणि जगाची वर्तमान काळात घडणा-या घटनांशी तुलना केल्याने हे सहजपणे सिद्ध ( प्रमाणीत ) होईल कि प्रभु येशु नक्कीच आपल्या आयुष्यात येईल.

**१. मंदिराची धुळधाण**

मग येशु मंदिरातून बाहेर निघून चालला असता त्यांचे शिष्य त्याला मंदिराच्या इमारती दाखववायास जवळ आले. तेव्हा येशु त्यास म्हणाला, हे सर्व तुम्ही पाहता ना ? मी तुम्हास खचीत सांगतो, पाडला जाणार नाही असा दगडावर दगड येथे राहणार नाही . मग तो मंदिरातून निघून जात असता त्याचा एक शिष्य त्याला म्हणाला, गुरूजी पाहा कसे हे धोंडे व कशा ह्या इमारती येशु त्याला म्हणाला, ह्या मोठया इमारती तू पाहतोस ना ? तो पाडला जाणार नाही, असा येथे दगडावर दगड राहणार नाही. मंदिर उत्तम पाषाणांनी व अर्पणांनी कसे सुशोभित केलेले आहे, असे कित्येक बोलत असतां त्याने म्हटले, हे जे तुम्ही पाहता त्यातला पाडला जाणार नाही असा दगडावर दगड राहणार नाही, असे दिवस येतील. हे ख्रि. पु. ७0 मध्ये पुर्ण झाले (**मत्तय २४ : १, २; मार्क १३ : १, २; लुक २१ :५)**.

**२. त्याच्या येण्याचे चिन्ह**

नंतर मंदिरासमोर जैतुनांच्या डोंगरावर बसला असता पेत्र, याकोब, योहान व अंद्रिया यांनी त्याला एकांती विचारले, या गोष्टी कधी होतील आणि या सर्व गोष्टी पुर्ण होण्याच्या सुमारास आल्या म्हणजे काय चिन्ह होईल, हे आम्हास सांगा ( **मत्तय २४: ३ ; मार्क १३: ३, ४ ; लुक २१: ७)**.

**३. फसवणारे येतील**

येशुने त्यास उत्तर दिले, तुम्हास कोणी फसवू नये म्हणून जपा. कारण पुष्कळजण माझ्या नामाने येऊन मी ख्रिस्त आहे असे म्हणतील व बहुतांस फसवतील. (शेवटची ओळ ) आणि तो काळ जवळ आला आहे, असे म्हणतील, त्याच्या मागे लागू नका. (**मत्तय २४ : ४, ५ ; मार्क १३: ५, ६ ; लुक २१ : ८ )**.

**४. लढाया आणि लढायांच्या अफवा**

लढाया व दंगे याविषयी तुम्ही ऐकाल. तेव्हा घाबरू नका कारण या गोष्टी प्रथम होणे अवश्य आहे, तरी इतक्याने शेवट होत नाही (**मत्तय २४ : ६ ; मार्क १३ : ८ ; लुक २१ : ९ )**.

**५. जातीय युद्ध, भूमीकंप, दुष्काळ आणि रोग**

तेव्हा त्याने त्यास म्हटले राष्ट्रांवर राष्ट्र व राज्यावर राज्य उठेल, मोठे भूमीकंप जागोजागी दुष्काळ व म-या होतील (**मत्तय २४ : ७ ; मार्क १३ : ८ ; लुक २१ : १०, ११ )**.

६. पण सर्व वेदनांचा हा प्रारंभ होय (मत्तय २४ : ८ ; मार्क १३ : ८).

**७. ख्रिश्चनांचा छळ**

तुम्ही आपणांस सांभाळा, कारण ते तुम्हास न्यायसभांच्या स्वाधीन करतील. परंतु हे सर्व होण्याअगोदर ते तुम्हावर हात टाकतील व तुमचा छळ करतील, तुम्हास सभास्थाने व बंदिशाळा यांच्या स्वाधीन करतील, आणि राजे व अधिकारी यांजपुढे माझ्या नामामुळे नेतील. हे तुम्हास साक्ष देण्यास कारण होईल (**मत्तय २४ : ९ ; मार्क १३ : ९ ; लुक २१ : १२, १३)**.

८. ते तुम्हास धरून नेऊन चौकशीकरिता स्वाधीन करतील तेव्हा आपण काय बोलावे याविषयी अगोदर चिंता करू नका, तर त्या घटकेस जे काही तुम्हास सुचवून दिले जाईल तेच बोला, कारण बोलणारे तुम्ही नाही तर पवित्र आत्मा आहे . यास्तव उत्तर कसे द्यावे याविषयी पुर्वी विचार न करण्याचा निर्धार मनात ठेवा, कारण मी तुम्हास अशी वाचा व बुद्धी देईन की ती अडविण्यास किंवा तिच्या विरूद्ध बोलण्यास तुमचे कोणी शत्रु समर्थ होणार नाहीत (**मार्क १३ : ८ ; लुक २१ : १४, १५)**.

**९. परिवारामध्ये विश्वासघात**

त्यावेळी बहुत अडखळतील व एकमेकांस धरून देतील, व एकमेकांचा द्वेष करतील. भाऊ भावाला व बाप मुलाला जीवें मारण्याकरितां धरून देईल, मुलें आईबापावर उठतील व त्यास जीवें मारतील. तरी तुमच्या मस्तकाच्या एका केसाचाही नाश होणार नाही. तुम्ही आपल्या धीराने आपले जीव मिळवाल (**मत्तय २४ : ९, १० ; मार्क १३ : १२, १३; लुक २१ : १६-१९ )**.

**१०. प्रेम थंडावणे**

आणि अधर्म वाढल्यामुळे पुष्कळांची प्रीती थंडावेल. परंतु शेवट पर्यत जो टिकेल तोच तरेल ( **मत्तय २४ : १२, १३ )**.

**११.** सर्व राष्ट्रांस साक्ष व्हावी म्हणून राज्याची ही सुवार्ता सर्व जगांत गाजवतील.तेव्हा शेवट होईल (**मत्तय २४ : १४ ; मार्क १३ : १०**).

**१२. जेरूसलेमेत ओसाडीचा अमंगल पदार्थ**

ह्यावर जेरूसलेमास सैन्यांचा वेढा पडत आहे असे पाहाल तेंव्हा त्याचा विध्वंस जवळ आला आहे असे समजा (**लुक २१ : २०) .** डॅनिएल संदेष्टयाच्या द्वारे सांगितलेला ओसाडीचा अमंगल पदार्थ पवित्रस्थानात उभा असलेला तुम्ही पाहाल. ( वाचणा-याने हे ध्यानात आणावे ) तेव्हा जे यहुदीयात असतील त्यांनी डोंगराकडे पळून जावे. जो धाब्यावर असेल त्याने आपल्या घरातील काही बाहेर काढण्याकरिता खाली उतरू नये आणि जो शेतांत असेल त्याने आपले वस्त्र घेण्याकरिता माघारे येऊ नये (**मत्तय २४ : १५-१८ ; मार्क १३ : १४-१६ ; लुक १७ : ३१ ; लुक २१ : २१) .** त्या दिवसांत गरोदर व स्तन पाजणा-या स्त्रियां असतील त्यांचे दुःख फारच होणार तुमचे पलायन हिवाळ्यांत किंवा शब्बाथ दिवशी होऊ नये म्हणून प्रार्थना करा. ( **मत्तय २४ : १९, २० ; मार्क १३ : १७, १८ ; लुक २१ : २३)**. ते तलवारीच्या धारेने पडतील, त्यास बंदिवान करून सर्व राष्ट्रांमध्ये नेतील आणि विदेश्यांचे काळ पुर्ण होत तोपर्यंत विदेशी लोक जेरूसलेमास पायाखाली तुडवतील (**लुक २१ : २४ )**.

**१३. जेकोबाचा संकटाचा समय ( इर्मया ३० :६, ७ )**

कारण जी सृष्टी देवाने उत्पन्न केली तिच्या प्रारंभापासून आजपर्यंत झाले नाहीत व पुढे होणार नाहीत, असे ते दिवस संकटाचे होतील. आणि ते दिवस प्रभुने थोडे केले नसते तर कोणाही मनुष्याचा निभाव लागला नसता. ज्यास त्याने निवडले त्या निवडलेल्यांसाठी त्याने ते दिवस थोडे केले आहेत (**मत्तय २४ : २१, २२ ; मार्क १३ : १९, २० ; लुक २१ : २३)**. कारण सर्व लिहलेल्या गोष्टी पुर्ण होण्यासाठी हे सुड घेण्याचे दिवस आहेत ( **लुक २१ : २२ )**.

**१४. खोटे ख्रिस्त व खोटे संदेष्टे**

त्यावेळेस कोणी तुम्हास म्हणेल पाहा, ख्रिस्त येथे आहे पाहा तेथे आहे, तर खरे मानू नका. कारण खोटे ख्रिस्त व खोटे संदेष्टे होतील आणि साधेल तर निवडलेल्यास देखील फसवावे म्हणून चिन्हे व चमत्कार दाखवतील. तुम्ही तर सावध राहा, पाहा मी अगोदरच तम्हास सर्व सांगून ठेवले आहे (**मत्तय २४ : २३, २४ ; मार्क १३ : २१-२३ ) .** यास्तव कोणी तुम्हास म्हणतील, पाहा तो अरण्यात आहे तर तिकडे जाऊ नका, तुम्हास म्हणतील पाहा तो आतल्या खोल्यात आहे, तर खरे मानू नका. कारण जशी वीज पुर्वेकडून निघून पश्चिमेपर्यंत चमकते तसें मनुष्याच्या पुत्राचे येणे होईल (**मत्तय २४ : २६, २७ ; लुक १७ : २३,२४)**.

**१५. आकाशातील चिन्हे**

त्या दिवसातील संकटामागून लागलेच. तेव्हा सुर्य, चंद्र व तारे यात चिन्हे होतील त्या दिवसातील संकटामागून लागलेच सुर्य अंधकारमय होईल, चंद्र प्रकाश देणार नाही, तारे आकाशातून पतन पावतील, व आकाशाची बळे डळमळतील ( **मत्तय २४ : २९ ; मार्क १३ : २४, २५ ; लुक २१ : २५) .** तेव्हा सुर्य, चंद्र व तारे यात चिन्हे होतील, आणि समुद्र व लाटा यांच्या गर्जनेने राष्ट्रे पृथ्वीवर घाबरी होऊन पेचात पडतील . भयाने व जगावर येणा-या गोष्टींची वाट पाहण्याने मनुष्ये मुर्च्छीत होतील, आकाशातील बळे डळमळतील (**लुक २१ : २५,२६ )**.



१६. तेव्हा मनुष्याच्या पुत्राचे चिन्ह आकाशात दिसेल, मग पृथ्वीवरल्या सर्व जातीचे लोक शोक करतील, ते मनुष्याच्या पुत्राला आकाशाच्या मेघांवर आरूढ होऊन पराक्रमाने व मोठ्या वैभवाने येताना पाहतील. करण्याच्या महानादाबरोबर तो आपल्या दुतांस पाठवील आणि ते आकाशाच्या एका सीमेपासून दुस-या सीमेपर्यंत त्याच्या निवडलेल्यास चा-ही दिशांकडून जमा करतील **( मत्तय २४ : ३०, ३१ ; मार्क १३ : २६, २७ ; लुक २१ : २७).**

१७. या गोष्टीस आरंभ होऊ लागेल तेव्हा नीट उभे राहा, आणि आपली डोकी वर करा, कारण तुमची मुक्तता समीप आली आहे **( लुक २१ : २८ ).**

**१८. जागृतीची आवश्यकता**

त्याने त्यास दाखला सांगितला, अंजीर व सर्व झाडे पाहा, ती फुटू लागली म्हणजे तुम्ही ते पाहून आपणच ओळखता की आता उन्हाळा जवळच आला आहे. तसेच या गोष्टी होताना पाहाल तेव्हा देवाचे राज्य जवळ आले आहे असे समजा **(मत्तय २४ : ३२, ३३ ; मार्क १३ : २८, २९ ; लुक २१ : २९ - ३१ ).** त्या दिवसाविषयी व त्या घटकेविषयी कोणाला ठाऊक नाही, स्वर्गातील दिव्यदुतास नाही, पुत्रालाही नाही, पित्याला मात्र ठाऊक आहे **(मत्तय २४ : ३६ ; मार्क १३ : ३२).**

१९. नोहाच्या दिवसांतल्या प्रमाणे मनुष्याच्या पुत्राचे येणे होईल, तेव्हा जसे जलप्रलयाच्या पुर्वीच्या दिवसांत नोहा नौकेत जाईपर्यंत लोक खातपीत होते, लग्न करून घेत होते आणि जलप्रलय येऊन सर्वास वाहवून नेईपर्यंत त्यास समजले नाही, तसेच मनुष्याच्या पुत्राचे येणे होईल **( मत्तय २४ : ३७ – ३९ ; लुक १७ : २६, २७).**

पहा अँजेल टिव्ही
www.angeltv.org

२०. तसेच ज्याप्रमाने लोटाच्या दिवसांत झाले, त्याप्रमाणे होईल, म्हणजे ते खातपीत, विकत घेतदेत होते, लावणी करीत होते, घरे बांधीत होते, परंतु ज्या दिवशी लोट सदोमांतून निघाला त्याच दिवशी आकाशातून अग्नि व गंधक यांची वृष्टी होऊन सर्वांचा नाश झाला. मनुष्याचा पुत्र प्रगट त्या दिवशी त्याप्रमाणे होईल **( लुक १७ : २८-३०).**

२१. लोटाच्या बायकोची आठवण करा. जो कोणी आपला जीव आपणासाठी राखावयाचा प्रयत्न करील तो त्याला मुकेल, आणि जो कोणी त्याला मुकेल तो त्याला वाचवील **( लुक १७ : ३२, ३३ ).**

२२. मी तुम्हास सांगतो, त्या रात्री एका बाजेवर दोघे असतील, एकाला घेतले जाईल व दुस-याला ठेवले जाईल, दोघी एकत्र दळीत असतील, एकीला घेतले जाईल व दुसरीला ठेवले जाईल **(मत्तय २४ : ४०, ४१ ; लुक १७ : ३४-३६).** त्यांनी त्याला म्हटले, प्रभुजी कोठे ? त्याने त्यास म्हटले, जेथे प्रेत आहे तेथे गीध जमतील **(मत्तय २४ : २८ ; लुक १७ : ३७ ).**

**२३. जागृत राहा आणि प्रार्थना करा**

प्रवासांत राहणा-या कोणी एका मनुष्याने आपले घर सोडविताना आपल्या दासांस अधिकार देऊन ज्याचे त्याला काम नेमून द्यावे व द्वारपालासहि जागे राहावयास आज्ञा करावी, त्याप्रमाणे हे आहे. यास्तव जागे राहा, कारण घरधनी केव्हा येतो, संध्याकाळी मध्यरात्री, कोंबडा आरवण्याच्या वेळी किंवा सकाळी हे तुम्हास ठाऊक नाही, नाहीतर तो अकस्मात येऊन तुम्हास झोपेत असताना पाहील **( मार्क १३ : ३४-३६ ).**

२४. आणखी हे समजा की अमुक प्रहरी चोर येईल हे घरधन्याला कळले असते तर तो जागा राहीला असता, आणि त्याने आपले घर फोडू दिले नसते. यास्तव तुम्हीही सिद्ध व्हा, कारण तुम्हास वाटत नाही अशा घटकेस मनुष्याचा पुत्र येईल **( मत्तय २४ : ४३, ४४ ).**

२५. तुम्ही आपणांस सांभाळा, नाहीतर कदाचित गुंगी, दारूबाजी व संसाराची चिंता यांनी तुमची अंतःकरणे जड होऊन तो दिवस पाशाप्रमाणे अकस्मात तुम्हावर येईल. सावध असा जागृत राहा, कारण तो समय केव्हा आहे हे तुम्हास ठाऊक नाही. कारण तो अवघ्या पृथ्वीतलावर राहणा-या सर्व लोकांवर तसाच येईल **(मार्क १३ : ३३ ; लुक २१ : ३४, ३५ ).**

२६. तुम्ही तर या सर्व होणा-या गोष्टी चुकवावयास व मनुष्याच्या पुत्रासमोर उभे राहावयास समर्थ व्हावे म्हणून सर्व प्रसंगी प्रार्थना करीत जागृत राहा **( लुक २१ : ३६ ).**

२७. मी तुम्हास खचीत सांगतो, हे सर्व पुर्ण होईपर्यंत ही पिढी नाहीशी होणार नाही. आकाश व पृथ्वी ही नाहीतशी होतील, परंतु माझी वचने नाहीतशी होणारच नाहीत. **( मत्तय २४ : ३४, ३५ ; मार्क १३ : ३०, ३१ ; लुक २१ : ३२, ३३).**

वैभवाच्या सिंहासनावर बसलेला महान राजा - प्रभु येशु ख्रिस्त त्याच्या मोठया अधिकाराने व वैभवाने आपल्या पवित्र दुतांसह व संतासह पुनरपि लौकर येत आहे.

तो मोठयाने म्हणाला, देवाची भीती बाळगा व त्याचा गौरव करा, कारण त्याची न्यायनिवाडा करावयाची घटिका आली आहे, ज्याने आकाश पृथ्वी, समुद्र व पाण्याचे झरे उत्पन्न केले, त्याला नमन करा. तुमच्या प्रभु देवाला भेटण्यास तयार राहा (प्रकटीकरण १४ : ७ ).

आता आणखी विलंब होणार नाही!

**आतां स्वर्गाचे राज्य जवळ आले आहे. पश्चाताप करा आणि हिया सुवार्तेवर विश्वास ठेवा.**

आपल्या प्रभु परमेश्वराला भेटण्यास तयार व्हा.



# देवाच्या राज्याची सुवार्ता

मराठी | MARATHI